**आजचे पंचांग**

दिनांक : २ सप्टेंबर २०२६ वार : बुधवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : पंचमी तिथी (सकाळी ०६:१२ पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी (३ सप्टेंबर सकाळी ०४:२५ पर्यंत) त्यानंतर सप्तमी तिथी नक्षत्र : भरणी नक्षत्र (३ सप्टेंबर रात्री ०१:४२ पर्यंत) त्यानंतर कृत्तिका नक्षत्र योग : ध्रुव योग (रात्री ०९:११ पर्यंत) त्यानंतर व्याघात योग

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**प्रेम प्रकरणातून अभियंता तरुणीला मारहाण**

पुणे : प्रियकरासोबत झालेल्या वादातून संगणक अभियंता तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना खराडी भागात घडली. या प्रकरणी प्रियकराविरोधात खराडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जान्हवी राजेशकुमार पाठक (वय २३, सध्या रा. खराडी, मूळ रा. बिहार) असे गळफास घेतलेल्या तरुणीचे नाव असून, अमृतकुमार अरुणकुमार सिंह (वय २३) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेली २३ वर्षीय तरुणी ही मूळ बिहारमधील पाटणा शहरातील रहिवासी आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### मुंढेंचा निर्णय कठोर, सरकारची माघार! ‘भेसळविरोधी’ लढ्याला मुदतवाढीचा धक्का; सुटे खाद्यतेल विक्रीला वर्षभराची मुभा; छोट्या व्यापाऱ्यांच्या दबावापुढे सरकार झुकले का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / वृत्तसंस्था : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कठोर भूमिका घेत सुटे खाद्यतेल विक्रीवर निर्बंध आणण्याचा निर्णय घेतला. मात्र छोट्या व्यापाऱ्यांना त्याचा फटका बसत असल्याचे सांगत राज्य सरकारने आता या निर्णयाला एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या व्यापाऱ्यांच्या बैठकीनंतर हा निर्णय जाहीर झाला. कायदा पाळावा लागेल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले असले तरी प्रश्न असा आहे की, कायदा अंमलात आणणाऱ्या अधिकाऱ्याचा निर्णय राजकीय दबावामुळे वारंवार बदलला जाणार असेल तर प्रशासनाची स्वायत्तता किती उरणार?

सुटे तेल विक्रीतील गुणवत्ता आणि भेसळ रोखणे हा सार्वजनिक आरोग्याचा विषय आहे. २०११ पासून संबंधित नियम अस्तित्वात असताना त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होताच सरकारला व्यापाऱ्यांच्या अडचणी आठवतात, ही बाब विरोधाभासी ठरते.

गरीब ग्राहक सुटे तेल खरेदी करतात, हा मुद्दा महत्त्वाचा आहे; पण त्यावर उपाय गुणवत्तेच्या नियमांना स्थगिती देणे नसून स्वस्त आणि सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देणे हा असायला हवा. एफडीए आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करण्याची घोषणा झाली आहे. मात्र वर्षभराची मुदत संपल्यानंतर काय होणार, हा खरा प्रश्न आहे. मुंढेंनी नियम लागू केले, सरकारने मुदत वाढवली; आता भेसळविरोधी लढ्यात नियम जिंकणार की राजकीय दबाव?

# आईच्या जातीवरूनही आरक्षणाचा हक्क! पितृसत्ताक रूढींना मद्रास उच्च न्यायालयाचा दणका

## पुद्दुचेरीतील ऐतिहासिक निकाल; समानतेच्या नव्या सामाजिक पर्वाची सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

मद्रास उच्च न्यायालयाने पुद्दुचेरी सरकारच्या पारंपरिक आणि पितृसत्ताक भूमिकेला स्पष्ट शब्दांत नकार देत मुलगा किंवा मुलगी आपल्या आईच्या जातीच्या आधारे आरक्षणाचा दावा करू शकतो, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. थेलगाम विरुद्ध पुद्दुचेरी केंद्रशासित प्रदेश या प्रकरणात न्यायमूर्ती डी. भरत चक्रवर्ती यांनी दिलेला हा निकाल केवळ आरक्षणाच्या प्रश्नापुरता मर्यादित न राहता लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि जातव्यवस्थेतील पारंपरिक चौकटींवर पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा ठरतो.

पुद्दुचेरी प्रशासनाने समाजाची रचना पितृसत्ताक असल्याचा आधार घेत मुलाची जात प्रामुख्याने वडिलांच्या जातीवरून निश्चित व्हावी, अशी भूमिका मांडली होती. मात्र न्यायालयाने ही भूमिका फेटाळून लावत, महिलांचे अधिकार केवळ जुन्या सामाजिक रूढींच्या आधारे मर्यादित करता येणार नाहीत, असे स्पष्ट केले.

या निकालाचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे आरक्षणाकडे पाहण्याची न्यायालयाची भूमिका. आरक्षणाचा उद्देश केवळ जन्मावर आधारित जात ओळख कायम ठेवणे नसून सामाजिक मागासलेपणा, भेदभाव, वंचितपणा आणि सामाजिक कलंक यामुळे निर्माण झालेली विषमता दूर करणे हा आहे. त्यामुळे एखाद्या मुलाला प्रत्यक्षात कोणत्या सामाजिक परिस्थितीचा सामना करावा लागला, हे महत्त्वाचे ठरते.



विशेषतः मुलाचा जन्म आणि संगोपन पुद्दुचेरीत झाले असेल आणि आई मूळची पुद्दुचेरीची रहिवासी असेल, तर वडील दुसऱ्या राज्यातून स्थलांतरित झाले आहेत, या कारणावरून आईच्या सामाजिक आणि स्थानिक ओळखीचा अधिकार नाकारता येणार नाही, अशी भूमिका न्यायालयाने घेतली. परिणामी पात्रतेच्या इतर अटी पूर्ण करणाऱ्या मुलांना SC, MBC किंवा OBC प्रवर्गातील आरक्षणाच्या लाभाचा मार्ग खुला होऊ शकतो.

ही भूमिका संविधानाच्या कलम १४, १५ आणि १६ मधील समानता आणि भेदभावविरोधी तत्त्वांशी जोडलेली आहे. स्त्रीचे सामाजिक अस्तित्व आणि तिच्या अधिकारांना केवळ विवाहानंतर किंवा पतीच्या ओळखीमुळे दुय्यम ठरवणे, ही मानसिकता घटनात्मक मूल्यांशी विसंगत असल्याचे या निर्णयातून अधोरेखित होते.

मात्र या निकालाकडे ‘जात संपवण्याचा’ थेट कायदेशीर निर्णय म्हणून पाहण्यापेक्षा, तो जात आणि सामाजिक ओळखीच्या पारंपरिक चौकटींवर प्रश्न उपस्थित करणारा महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. कारण आरक्षणाची संकल्पना स्वतः सामाजिक विषमता दूर करण्यासाठी निर्माण झाली आहे. अंतिम ध्येय मात्र असे समाजव्यवस्थेचे असले पाहिजे की, जन्मामुळे कोणालाही उच्च-नीच ठरवले जाणार नाही आणि संधींसाठी जात निर्णायक ठरणार नाही.

आईच्या जातीला कायदेशीर मान्यता देण्याचा हा दृष्टिकोन त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो. कारण जात ही केवळ वंशपरंपरेची खूण नसून सामाजिक अनुभव, भेदभाव आणि संधींच्या असमानतेशी जोडलेली वास्तवस्थिती आहे. जातभेद संपवायचा असेल तर केवळ घोषणा पुरेशा नाहीत; कायदा, प्रशासन आणि समाजाची मानसिकता या तिन्ही पातळ्यांवर बदल आवश्यक आहे. मद्रास उच्च न्यायालयाचा हा निर्णय त्या बदलाच्या प्रक्रियेला वैचारिक बळ देणारा ठरू शकतो. हा निकाल म्हणूनच केवळ आईच्या जातीवरून आरक्षणाचा हक्क देणारा निर्णय नाही; तो ‘वंश म्हणजे केवळ वडिलांची ओळख’ या पितृसत्ताक कल्पनेला आव्हान देत समानतेच्या नव्या सामाजिक पर्वाची दारे उघडणारा निर्णय म्हणून महत्त्वाचा ठरतो.

# ‘एक्सपायरी’चा काळाबाजार! जुन्या खाद्यपदार्थांना नव्या तारखांचा मुलामा

## नवी मुंबईत ११ निर्यातदार कंपन्यांविरोधात कारवाई; ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी मुंबई / प्रतिनिधी

नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या गंभीर प्रकाराचा नवी मुंबई गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. जुन्या खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील उत्पादन तारीख, ‘बेस्ट बिफोर’, ‘एक्सपायरी डेट’, बॅच नंबर आणि एमआरपीमध्ये फेरफार करून नव्या तारखांसह विक्री व निर्यात केली जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

गुन्हे शाखेने तुर्भे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील एका गोदामावर छापा टाकला. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील तारखांची तपासणी करण्यात आली. त्यावेळी जुन्या तारखा बदलून नव्या तारखा छापण्यासाठी विशेष ‘डेट प्रिंटिंग मशीन’ वापरले जात असल्याचे आढळले.

तब्बल सहा दिवसांच्या तपासणीत १८ निर्यातदारांचा सुमारे २ कोटी ४६ लाख ५३ हजार ३५४ रुपयांचा माल तपासण्यात आला. त्यापैकी ११ निर्यातदारांच्या सुमारे ७५ लाख २१ हजार २६९ रुपयांच्या मालावर लेबल, उत्पादन तारीख, एक्सपायरी किंवा ‘बेस्ट बिफोर’ तारीख, बॅच नंबर आणि एमआरपीमध्ये फेरफार केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या कारवाईत डेट प्रिंटिंग मशीनसह विविध खाद्यपदार्थ आणि अन्य साहित्य असा ७५ लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयप्रकाश संचतीराम सिंग आणि जया नवरंग बहादूर सिंग यांच्यासह संबंधित ११ निर्यातदार कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

मुदत संपलेल्या अन्नपदार्थांना नव्या तारखेचा मुखवटा लावणे हा केवळ फसवणुकीचा प्रकार नाही; तो नागरिकांच्या आरोग्याशी केलेला गंभीर खेळ आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाकडून सुरू आहे.

# ‘ॲक्शन मोड’ की कागदोपत्री मोहीम? शाळांच्या दुरवस्थेवर पुन्हा अहवालांचा खेळ!

## भाजपशासित राज्यांत शिक्षण सुधारण्याच्या घोषणा; प्रत्यक्षात वर्गखोल्या, स्वच्छतागृहे आणि पाण्याचे प्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / जालना : वृत्तसेवा

जिल्हा परिषद शाळांमधील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, कंपाऊंड वॉल यांची सद्यःस्थिती तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आदर्श शाळा, डिजिटल वर्ग, ग्रंथालये आणि क्रीडांगणांचा आराखडा तयार करण्याचेही आदेश देण्यात आले.

मात्र प्रश्न एवढाच अहवाल किती



आणि प्रत्यक्ष काम किती?

भाजपशासित राज्यांमध्ये शिक्षणाच्या पायाभूत सुविधांबाबत घोषणा, बैठका आणि आढावे मोठ्या प्रमाणावर होतात; पण ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये आजही मूलभूत सुविधांसाठी विद्यार्थ्यांना संघर्ष करावा लागत असल्याची स्थिती असेल, तर या ‘ॲक्शन मोड’चा अर्थ काय?

निधी उपलब्ध असल्याचे सांगितले जाते, मात्र तो वेळेत खर्च होत नाही. निविदा, प्रशासकीय मान्यता आणि कागदोपत्री प्रक्रिया यामध्ये विकास अडकतो. परिणामी शाळेच्या भिंतीवर रंगरंगोटीचे आश्वासन दिसते; पण वर्गखोलीत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळतातच असे नाही. समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक सलोख्याचे संदेश भिंतीवर रंगवणे निश्चितच चांगले; पण शिक्षणव्यवस्थेला केवळ घोषवाक्यांनी नव्हे, तर मजबूत पायाभूत सुविधांनी उभे करावे लागते.

आता आणखी एक अहवाल नको; अहवालातील प्रत्येक त्रुटीवर वेळबद्ध कारवाई आणि त्याची सार्वजनिक माहिती हवी. बैठकांपेक्षा निकाल आणि घोषणांपेक्षा प्रत्यक्ष शाळा सुधारल्या, तरच ‘ॲक्शन मोड’ खरा मानता येईल.

# मोदी राज्यात विरोधक असुरक्षित? महुआ मोइत्रांच्या सुरक्षेसाठी न्यायालयाचा दणका!

## खासदारावर अंडी-दगड फेकण्याच्या घटनांवर न्यायालय संतप्त; ३० दिवसांचे सुरक्षा कवच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई / प्रतिनिधी :

कोलकाता : तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांच्यावरील कथित हल्ल्यांची गंभीर दखल घेत कलकत्ता उच्च न्यायालयाने त्यांना ३० दिवसांसाठी विशेष सशस्त्र पोलीस सुरक्षा देण्याचे आदेश दिले आहेत. सार्वजनिक कार्यक्रमात एका खासदारावर अंडी फेकली जात असतील, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय, असा गंभीर सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

न्यायालयाच्या आदेशातील ठळक मुद्दे

* ३० दिवस विशेष सुरक्षा : महुआ मोइत्रा यांच्या कृष्णनगर मतदारसंघातील सार्वजनिक कार्यक्रम आणि जनसंपर्काच्या वेळी दोन अतिरिक्त सशस्त्र पोलीस कर्मचारी तैनात करण्याचे निर्देश.

* अंडी फेकण्याच्या प्रकारावर कठोर कारवाई : सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अंडी फेकणे किंवा अशा प्रकारे हिंसक वातावरण निर्माण करणे खपवून घेऊ नये, अशी न्यायालयाची स्पष्ट भूमिका.

* कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर चिंता : एखाद्या खासदारावर सार्वजनिक ठिकाणी हल्ला किंवा अपमानास्पद प्रकार होत असेल, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय, असा न्यायालयाचा थेट सवाल.

* सुरक्षा म्हणजे तपासातून संरक्षण नव्हे : मोइत्रांविरोधात सुरू असलेल्या द्वेषयुक्त भाषणाच्या प्रकरणाच्या तपासावर या सुरक्षा आदेशाचा कोणताही परिणाम होणार नाही. तपास यंत्रणेला त्यांनी पूर्ण सहकार्य करावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

* राजकीय मतभेदांना हिंसेचे स्वरूप नको : विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी असो किंवा सत्ताधारी पक्षाचा नेता सार्वजनिक जीवनात कोणावरही हिंसक पद्धतीने हल्ला करण्यास मोकळीक असू शकत नाही.

या आदेशामुळे एका व्यापक प्रश्नाला पुन्हा वाचा फुटली आहे. लोकशाहीत सत्तेला प्रश्न विचारणारा खासदार सुरक्षित आहे का? महुआ मोइत्रा यांना सार्वजनिक कार्यक्रमांसाठी न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर सुरक्षा द्यावी लागत असेल, तर राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

मोदी सरकारच्या काळात विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींवर राजकीय दबाव असल्याचे आरोप वारंवार केले जात आहेत. मात्र अशा आरोपांपेक्षा महत्त्वाचे म्हणजे विरोधकांना प्रत्यक्षात निर्भयपणे जनतेत जाता येते का, हा प्रश्न. राजकीय विरोधाला उत्तर विचारांनी, धोरणांनी आणि मतपेटीतून दिले पाहिजे; अंडी, दगड किंवा धमक्यांमधून नव्हे.

महुआ मोइत्रा यांच्यावर आरोप असतील तर त्यांची चौकशी कायद्याने झालीच पाहिजे. पण आरोप असणे आणि एखाद्या लोकप्रतिनिधीच्या सुरक्षिततेशी तडजोड करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. न्यायालयाने याच मूलभूत फरकाची जाणीव करून दिली आहे.

# अमेरिकेत ‘समावेशा’ची भाषा, भारतात मुस्लिम अधिकाऱ्यांना ‘नो एन्ट्री’?

## मोहन भागवतांच्या वक्तव्याची कसोटी भारतातच; अमित शाहांच्या दौऱ्यावरील महुआ मोइत्रांच्या आरोपांनी दुहेरी भूमिकेवर सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

दिल्ली : प्रतिनिधी :

अमेरिकेच्या भूमीवर हिंदू समाज, विविधता आणि सर्वसमावेशकतेबद्दल मोठमोठी विधाने करायची आणि भारतात मात्र मुस्लिमांविषयी कथित भेदभावाच्या घटना घडत असतील, तर या दोन भूमिकांमध्ये नेमके अंतर किती? हा प्रश्न आता केवळ राजकीय आरोपांचा राहिलेला नाही. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यादरम्यान मुस्लिम वरिष्ठ अधिकाऱ्यांना कथितपणे बाजूला करण्यात आल्याचा आरोप केल्याने ‘बोलणे वेगळे आणि प्रत्यक्ष वागणे वेगळे’ या राजकीय संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

मोइत्रा यांच्या दाव्यानुसार, सिलिगुडीचे पोलीस आयुक्त वकार रझा यांना स्वागताच्या रांगेतून बाजूला करण्यात आले, डीजी एसटीएफ जावेद शमीम यांना कार्यक्रमासाठी बोलावण्यात आले नाही आणि आयएएस अधिकारी खलील अहमद यांना बैठकीतून बाहेर जाण्यास सांगण्यात आले. त्यांनी या कथित प्रकाराला सांप्रदायिक भेदभाव ठरवत आयएएस आणि आयपीएस संघटनांच्या मौनावरही प्रश्न उपस्थित केला आहे.

हे आरोप गंभीर आहेत; पण आरोप म्हणजे सिद्ध झालेली वस्तुस्थिती नव्हे. संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका, कार्यक्रमाची अधिकृत यादी किंवा या आरोपांबाबत केंद्र अथवा पश्चिम बंगाल सरकारचे स्पष्टीकरण समोर येणे आवश्यक आहे. मात्र आरोपांची सत्यता तपासली जात असतानाच त्यातून उपस्थित होणारा मूलभूत प्रश्न टाळता येत नाहीसरकारी यंत्रणेत अधिकारी त्याच्या धर्माने मोजला जातो की त्याच्या कर्तृत्वाने?

याच ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेतील आपल्या वक्तव्यांत मांडलेल्या सर्वसमावेशकतेच्या भूमिकेची कसोटी लागते. भारताची ओळख विविधतेत आहे, प्रत्येक समुदायाला स्थान आहे, अशी भूमिका जगासमोर मांडणे आणि देशात एखाद्या समुदायाच्या अधिकाऱ्याला त्याच्या धर्मामुळे दुय्यम वागणूक मिळत असल्याचे आरोप होणेया दोन्ही चित्रांमध्ये साम्य कसे शोधायचे?

जर मुस्लिम अधिकारी केवळ मुस्लिम असल्यामुळे सरकारी कार्यक्रमापासून दूर ठेवले गेले असतील, तर तो प्रकार केवळ एखाद्या अधिकाऱ्याचा अपमान ठरणार नाही; तो भारतीय संविधानाच्या धर्मनिरपेक्ष आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांवरच आघात ठरेल. सरकारी पदावर बसलेला अधिकारी प्रथम भारतीय अधिकारी असतो. त्याची धार्मिक ओळख त्याच्या घटनात्मक कर्तव्याच्या आड येऊ शकत नाही.

अमित शाह यांच्या दौऱ्यातील बैठक मात्र सीमासुरक्षा, सिलिगुडी कॉरिडॉर, घुसखोरी, केंद्रीय सुरक्षा यंत्रणा आणि राज्य प्रशासनातील समन्वयासारख्या अत्यंत संवेदनशील विषयांशी संबंधित होती. त्यामुळे कोणत्या अधिकाऱ्याला कुठे बोलवायचे, यामागे प्रशासकीय किंवा सुरक्षा कारणे होती का, हेही स्पष्ट झाले पाहिजे. न्याय्य चौकशीची मागणी म्हणजे आरोप सिद्ध झाल्याचे गृहीत धरणे नव्हे.

पण याच कारणामुळे सरकारने मौन न बाळगता स्पष्टीकरण देणे अधिक आवश्यक आहे. कारण आज प्रश्न एका मुस्लिम अधिकाऱ्याचा आहे; उद्या तो कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा विचारांच्या अधिकाऱ्याचा असू शकतो.

मोहन भागवतांनी अमेरिकेत भारताच्या सहिष्णु आणि सर्वसमावेशक प्रतिमेची मांडणी केली असेल, तर त्या प्रतिमेची खरी परीक्षा वॉशिंग्टन किंवा न्यूयॉर्कमध्ये नाही, तर दिल्ली, कोलकाता, सिलिगुडी आणि देशाच्या प्रत्येक प्रशासकीय कार्यालयात होणार आहे.

भारताला जगासमोर ‘विविधतेचा देश’ म्हणून मिरवायचे असेल, तर त्या विविधतेचा सन्मान सरकारी कार्यक्रमांच्या दारातही दिसला पाहिजे. मुस्लिम नागरिक देशाचा समान नागरिक आहे, मुस्लिम अधिकारीही तितकाच घटनात्मक अधिकारी आहे.

म्हणूनच महुआ मोइत्रांच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. आरोप खोटे असतील तर ते स्पष्टपणे खोडून काढले पाहिजेत; आणि खरे असतील तर जबाबदारांवर कारवाई झाली पाहिजे.

कारण संघाच्या व्यासपीठावर ‘समावेशक भारत’ आणि प्रत्यक्ष प्रशासनात ‘धर्माच्या आधारावर निवड’ही दरी लोकशाहीला मान्य होऊ शकत नाही. भारताची प्रतिमा भाषणांनी नव्हे, तर वर्तनाने ठरते. अमेरिकेत दिलेल्या संदेशापेक्षा भारतात घेतलेला निर्णय अधिक बोलका असतो.

## संपादकीय

### व्हॉट्सअॅप'वर डॉक्टरांची हकालपट्टी; फडणवीस सरकारला रुग्णांच्या जीवापेक्षा फाईल मोठी वाटते?

मुंबईतील ग्रँट गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज आणि सर जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समधील १९ सहाय्यक प्राध्यापकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या अचानक रद्द करण्याचा प्रकार महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या विदारक वास्तवावर बोट ठेवणारा आहे. विशेषतः शस्त्रक्रिया सुरू असताना डॉक्टरांच्या मोबाईलवर 'सेवा समाप्त' झाल्याचा व्हॉट्सअॅप संदेश पाठविला जात असेल, तर हा केवळ प्रशासकीय निर्णय राहत नाही; तो सरकारच्या आरोग्य धोरणाच्या प्राधान्यक्रमांवरच प्रश्नचिन्ह उभे करणारा प्रकार ठरतो.

फडणवीस सरकारकडून विकास, आधुनिक आरोग्य सुविधा आणि वैद्यकीय पायाभूत सुविधांच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. नवीन इमारती, उपकरणे, प्रकल्प आणि डिजिटल व्यवस्था यांची आकडेवारी सांगितली जाते. पण रुग्णालयात रुग्ण तपासण्यासाठी, शस्त्रक्रिया करण्यासाठी आणि गंभीर रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी डॉक्टरच अपुरे असतील, तर या सगळ्या घोषणांचा उपयोग काय? आरोग्यव्यवस्थेची खरी ताकद इमारतीत नसते; ती डॉक्टर, परिचारिका आणि उपलब्ध मनुष्यबळात असते.

जे. जे. रुग्णालयातील कार्डिओलॉजी, सीटीव्हीएस, न्यूरोसर्जरी आणि नेत्ररोगशास्त्र यांसारखे विभाग कोणत्याही प्रशासकीय प्रयोगासाठी खेळाचे मैदान नाहीत. येथे येणारा रुग्ण बहुधा गंभीर अवस्थेत असतो. हृदयाची शस्त्रक्रिया, मेंदूवरील शस्त्रक्रिया किंवा इतर गुंतागुंतीच्या उपचारांसाठी रुग्ण सरकारी रुग्णालयाकडे आशेने पाहतो. अशा विभागांमध्ये कामाचा ताण कमी करण्यासाठी प्रशासनानेच तात्पुरत्या नियुक्त्या केल्या असतील, तर त्या डॉक्टरांना अचानक दूर करण्यापूर्वी रुग्णसेवेची पर्यायी व्यवस्था केली का, हा साधा प्रश्न आहे.

सरकारकडे नियमांचा दाखला आहे. नियमित किंवा एमपीएससीमार्फत उमेदवार उपलब्ध झाल्यास तात्पुरती नियुक्ती संपुष्टात येऊ शकते. नियम चुकीचा असेलच असे नाही. पण नियम म्हणजे विवेकबुद्धीचा पर्याय नाही. नियम लागू करताना परिस्थिती, रुग्णभार, विभागाची गरज आणि सुरू असलेल्या उपचारांची सातत्यता यांचा विचार करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

विशेष म्हणजे डॉक्टर प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करीत असताना त्यांच्या हातातील काम संपविण्याचा संदेश मोबाईलवर पोहोचतो, ही बाब धक्कादायक आहे. एखाद्या सरकारी कार्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा संपविणे आणि ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णाच्या जीवाशी संबंधित जबाबदारी पार पाडणाऱ्या डॉक्टराला अचानक दूर करणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. आरोग्य प्रशासनाने हा फरक समजून घेतला नसेल तर समस्या केवळ एका निर्णयात नाही; समस्या धोरणाच्या दृष्टिकोनात आहे.

फडणवीस सरकारच्या आरोग्य धोरणाला आता एक मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेरुग्ण महत्त्वाचा की मनुष्यबळाची कागदी आकडेवारी?

सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता असल्याच्या तक्रारी सातत्याने ऐकू येतात. दुसरीकडे खासगी रुग्णालयातील उपचार सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. अशा परिस्थितीत सार्वजनिक रुग्णालये मजबूत करण्याऐवजी उपलब्ध डॉक्टरांनाच अस्थिर केले जात असेल, तर सरकार नेमके कोणत्या दिशेने चालले आहे?

तात्पुरती नियुक्ती ही कायमस्वरूपी उपाययोजना नाही, हे मान्य. पण कायमस्वरूपी भरतीची प्रक्रिया संथ असेल, रिक्त पदे दीर्घकाळ पडून राहत असतील आणि त्या काळात रुग्णभार वाढत असेल, तर प्रशासनाने अंतरिम व्यवस्था करणे अपरिहार्य आहे. डॉक्टर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची; डॉक्टर हटविल्यानंतर रुग्णसेवा सुरळीत ठेवण्याची जबाबदारीही सरकारचीच.

राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने या प्रकाराला विरोध करून १९ डॉक्टरांच्या पुनर्नियुक्तीची मागणी केली आहे. सरकारने या मागणीकडे केवळ कर्मचारी संघटनेचा दबाव म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा प्रश्न वैद्यकीय शिक्षकांचा असला तरी त्याचा थेट परिणाम रुग्णांवर होतो. कार्डिओलॉजी किंवा न्यूरोसर्जरी विभागातील एका डॉक्टरच्या उपलब्धतेचा प्रश्न एखाद्या गंभीर रुग्णासाठी जीवन-मरणाचा प्रश्न असू शकतो.

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी या डॉक्टरांना पुन्हा सामावून घेण्याचा किंवा इतर रिक्त जागांवर नियुक्त करण्याचा सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले जाते. आता सरकारने या आश्वासनाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. केवळ बैठक, आश्वासन आणि प्रसिद्धीपत्रकांनी आरोग्यव्यवस्था सुधारत नाही. रुग्णालयाच्या प्रत्यक्ष वॉर्डमध्ये, ऑपरेशन थिएटरमध्ये आणि बाह्यरुग्ण विभागात सरकारचे धोरण दिसले पाहिजे.

या घटनेने आणखी एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहेसरकारी आरोग्यव्यवस्थेचे प्रशासन डॉक्टरांना 'मनुष्यबळ' म्हणून पाहते की 'रुग्णसेवेचे आधारस्तंभ' म्हणून? जर डॉक्टर फक्त पदसंख्या आणि रिक्त जागांच्या तक्त्यातील आकडे असतील, तर रुग्णसेवेचा मानवी चेहरा कुठे राहतो?

फडणवीस सरकारने या प्रकरणाकडे प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून पाहू नये. १९ डॉक्टरांना परत घेतले किंवा नाही, एवढ्यावर या प्रकरणाचे गांभीर्य संपत नाही. भविष्यात अशा प्रकारे कार्यरत वैद्यकीय कर्मचाऱ्यांना हटविताना रुग्णसेवेची सातत्यपूर्ण व्यवस्था, जबाबदारीचे हस्तांतरण आणि पारदर्शक प्रशासकीय प्रक्रिया अनिवार्य करण्याची गरज आहे.

आरोग्य विभागात 'डिजिटल महाराष्ट्र'ची भाषा बोलताना डॉक्टरांना बडतर्फीचा संदेश व्हॉट्सअॅपवर पाठविणे हा डिजिटल कारभाराचा विजय नसून प्रशासकीय संवेदनशून्यतेचा पराभव आहे.

सरकारने हे लक्षात ठेवावेरुग्णालयातील रुग्ण हा फाईल क्रमांक नाही. त्याच्या छातीत धडधडणारे हृदय आहे, मेंदू आहे, कुटुंबाची आशा आहे आणि जगण्याची इच्छा आहे. त्या रुग्णावर शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टराला अचानक व्हॉट्सअॅपवरून हटविण्यापूर्वी सरकारने या सगळ्यांचा विचार केला पाहिजे.

सरकारे येतात-जातात, मंत्री बदलतात, अधिकारी बदलतात; पण रुग्णालयातील रुग्णाचा जीव कोणत्याही सरकारच्या फाईलपेक्षा मोठा असतो. म्हणूनच १९ डॉक्टरांच्या नियुक्तीचा निर्णय तातडीने पुनर्विचारात घ्यावा. रुग्णसेवेवर परिणाम होणार नाही याची हमी द्यावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला घोषणांच्या नव्हे, तर पुरेशा डॉक्टरांच्या, पारदर्शक भरतीच्या आणि संवेदनशील प्रशासनाच्या आधारावर उभे करावे. अन्यथा प्रश्न १९ डॉक्टरांचा राहणार नाही. प्रश्न असा असेलफडणवीस सरकारच्या आरोग्य धोरणात 'रुग्ण' नेमका कुठे आहे?

# भटके-विमुक्त दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

## सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ७५ वा भटके-विमुक्त दिवस रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, परिसंवाद, ढोल-ताशांचा गजर आणि प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भटके-विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

ब्रिटिश राजवटीत १८७१ पासून विमुक्त जात समूहाला 'गुन्हेगार जमात' संबोधून तारेच्या कुंपणात बंदिस्त करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी भारत सरकारने या घटकांना या कुंपणाच्या जोखडातून मुक्त केले. या ऐतिहासिक मुक्तीचा जागर भटके-विमुक्त दिनाच्या कार्यक्रमातून करण्यात आला.

या कार्यक्रमाला तारेच्या कुंपणात जन्मलेले आणि सध्या १०३ वर्षांचे असलेले समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकर यांची विशेष उपस्थिती होती.

महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या अधिपत्याखाली भाटनगर, पिंपरी येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी 'ब' प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, माजी महापौर कविचंद भाट, नगरसदस्य डब्बू




आसवानी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त गोरख लिमन, कामगार नेते तथा भाट समाज सेवा ट्रस्टचे शहर अध्यक्ष मनोज माछरे, माजी जनसंपर्क अधिकारी रमेश भोसले, भटक्या-विमुक्त जाती-जमाती सामाजिक आधार संघटनेचे अध्यक्ष हरिभाऊ सावंत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'भटक्या-विमुक्त समाजाची दशा आणि विकासाची दिशा' या विषयावर आयोजित परिसंवादात वक्त्यांनी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकला. भटके-विमुक्त समाजातील अनेक घटक आजही हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत असून, शिक्षण, रोजगार, निवारा आणि मूलभूत सुविधांच्या बाबतीत त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या योजनांचा प्रभावी लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि सामाजिक हक्कांबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. ढोल-ताशांच्या गजरासह झालेल्या सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासाचे स्मरण करताना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संदेश देण्यात आला.

# चिखली जलशुद्धीकरण केंद्रातील कामामुळे 3 सप्टेंबरला पाणीपुरवठा बंद

## बोऱ्हाडेवाडी, मोशी, चऱ्होली, डुडुळगावसह विविध भागांवर परिणाम;

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

चिखली जलशुद्धीकरण केंद्र येथे २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन (द.ल.ली.) क्षमतेच्या नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पासाठी उच्चदाब वीजपुरवठा करण्याकरिता गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) उच्चदाब केबल वीजप्रणालीशी जोडण्याचे काम करण्यात येणार आहे.

त्यामुळे सकाळी १० ते सायंकाळी ६ या कालावधीत उच्चदाब वीजपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून, त्याचा परिणाम चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर होणार आहे.

या कामामुळे बोऱ्हाडेवाडी, इंद्रायणीनगर, सेक्टर ४, ६, ९, ११ व १२, शीवरस्ता, चक्रपाणी वसाहत, धावडेवस्ती, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, चोवीसावाडी तसेच परिसरातील पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे.

तसेच शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होण्याची शक्यता महापालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे.

विद्युतविषयक काम करताना कामगार आणि यंत्रणेची सुरक्षितता लक्षात घेऊन उच्चदाब वीजपुरवठा बंद ठेवणे आवश्यक असल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

त्यामुळे संबंधित परिसरातील नागरिकांनी गुरुवारच्या पाणीपुरवठा बंदीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा आणि पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

नागरिकांनी सहकार्य करून पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# मसाप पिंपरी चिंचवडचे राजन लाखे पुन्हा अध्यक्षपदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

दिनांक २९ ऑगस्ट रोजी काशीधाम कार्यालय सभागृहात महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी संपन्न झाली.



मसाप पुणे जिल्हा प्रतिनिधी पुरूषोत्तम काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. दोन सदस्यांनी माघार घेतली.त्यामुळे कार्यकारिणी बिनविरोध निवडून आली. मसाप पुणे चे कार्यवाह सुनील महाजन यावेळी केंद्रीय निरीक्षक म्हणून उपस्थित होते. फेरनिवडीमध्ये अध्यक्ष राजन लाखे, उपाध्यक्ष रजनी शेठ, कार्यवाह म्हणून संजय जगताप यांनी आपली पदे राखली.

दुसरे उपाध्यक्ष म्हणून उद्योजक मकरंद बापट, दुसऱ्या कार्यवाह म्हणून गीता सुतार, कोषाध्यक्ष म्हणून विजय नाईक यांनी निवड झाली. नव्या कार्यकारिणीमध्ये नवीन चेहरे म्हणून किरण लाखे, मीनल लाड, इला पवार, निलीमा फाटक, दत्तू ठोकळे, किरण जोशी, बाळासाहेब गोरे, अशोक होनराव, संजय होनकळस निवडून आले.

मसाप तळेगाव दाभाडे, राजगुरूनगर चे अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.

वरीष्ठ पत्रकार बाबू डिसोजा आणि व्हिडिओ जर्नालिस्ट माधुरी डिसोजा यांनी वृत्त आढावा घेतला.

# महापालिका सेवेतून ऑगस्टअखेर ३८ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

## २८ जण नियत वयोमानानुसार, तर १० जणांनी घेतली स्वेच्छानिवृत्ती; सन्मानचिन्ह देऊन गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी




पिंपरी-चिंचवड महापालिका सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची सेवा आणि कार्य निश्चितच प्रेरणादायी असून, त्यांच्या योगदानाची आठवण महापालिकेस सदैव राहील. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, निरोगी आणि समाधानाचे जावो, अशा शुभेच्छा उपआयुक्त संदीप खोत यांनी दिल्या.

महापालिका सेवेतून ऑगस्ट २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या २८ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण ३८ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार व निरोप समारंभ संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात उत्साहात पार पडला. यावेळी उपआयुक्त खोत बोलत होते.

सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेसाठी उपआयुक्त संदीप खोत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, महादेव बोत्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी आणि सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, उपअभियंता सुरेखा कुलकर्णी, लघुलेखक विजयश्री देसाई, मुख्याध्यापिका सविता पवार, कार्यालय अधीक्षक संजय गरगरे, लेखापाल सुचेता कुलकर्णी, मुख्य आरोग्य निरीक्षक सुनील वाटाडे, सिस्टर इनचार्ज निशिगंधा अमोलिक, क्रीडा शिक्षक शिवाजी मुटकुळे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्यांमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र मंडपे, उपअभियंता सत्वशील शितोळे, दूरध्वनी चालक राजश्री गायकवाड, प्लंबर रोहिदास जमदाडे, मजूर संजू साळवे, स्प्रे-कुली दत्तात्रय ढगे, सफाई कामगार सुभाष गायकवाड, रामदास तळपे, पांडुरंग झांजरे आणि सिताराम लांडे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर मुख्य लिपिक माया वाकडे यांनी आभार मानले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेवरून राजकीय वातावरण तापले

## उद्याची सभा कायदेशीर की बेकायदेशीर? सत्ताधारी म्हणतात 'सभा होणारच'; विरोधकांकडून न्यायालयीन नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची उद्या (बुधवार, दि. २ सप्टेंबर) होणारी सर्वसाधारण सभा कायदेशीर आहे की बेकायदेशीर, यावरून महापालिका वर्तुळातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सत्ताधाऱ्यांकडून उद्याची सभा होणारच असा दावा केला जात असताना विरोधकांनी सभेच्या कायदेशीरतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे उद्याची सभा प्रत्यक्षात होणार की कायदेशीर पेचात अडकणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

महापौर रवी लांडगे यांनी उद्याची सभा ही विशेष सभा नसून दर महिन्याला होणारी नियमित सर्वसाधारण सभा असल्याचे स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या विधी विभागाने सभेला हिरवा कंदील दिला असून, शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पक्षनेते प्रशांत शितोळे यांनीही सभा कायदेशीर असल्याचा दावा केला आहे. तहकूब सभेमध्ये नवीन विषय घेता येत नसले, तरी नियमित सर्वसाधारण सभेत नवीन विषय कायदेशीररीत्या घेता येतात. उद्याच्या सभेतील विषयपत्रिकेवरील सर्व विषय मंजूर होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसदस्य सभेला उपस्थित राहणार असल्याची चर्चा असून, सत्ताधारी गटाकडून सभा सुरळीत पार पाडण्यासाठी तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

विरोधकांकडून कायदेशीरतेवर आक्षेप

दुसरीकडे, विरोधी गटाने सभेच्या वैधतेवर गंभीर आक्षेप घेतला आहे. ही सर्वसाधारण सभा नियमबाह्य असल्याचा दावा करण्यात आला असून, या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि महापौर रवी लांडगे यांना न्यायालयीन नोटीस पाठवण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, सभेच्या कायदेशीरतेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नावर कायदेशीर बाबी महापालिका नगरसचिव पाहून घेतील, अशी भूमिका पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी मांडली आहे. त्यामुळे सभेच्या आयोजनापासून विषयपत्रिकेवरील निर्णयांपर्यंत प्रत्येक बाबीवर कायदेशीर आक्षेप घेतला जाणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

सभागृहात काय होणार?

एका बाजूला सत्ताधारी गट सभा नियमित असल्याचे सांगत ठामपणे पुढे जात आहे, तर दुसऱ्या बाजूला विरोधक सभेच्या वैधतेलाच आव्हान देत आहेत. त्यामुळे उद्याच्या सभेत राजकीय आरोप-प्रत्यारोपांसोबतच कायदेशीर मुद्द्यांवरूनही जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

सभा नियमित की विशेष, विषयपत्रिकेवरील विषय घेण्याची प्रक्रिया नियमबद्ध आहे का आणि न्यायालयीन नोटिशीनंतर प्रशासन कोणती भूमिका घेणार, या प्रश्नांची उत्तरे उद्याच्या सभेत मिळणार आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या महापालिका राजकारणासाठी उद्याची सभा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पहिल्या 'संविधान सन्मान महिला साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी ॲड. प्रार्थना सदावर्ते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

विश्वबंधुता साहित्य परिषद आणि सहयोगी संस्थांच्या वतीने पहिल्या 'संविधान सन्मान महिला साहित्य संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे. संविधान दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर २०२६) पुण्यात हे संमेलन होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत ॲड. प्रार्थना सदावर्ते यांची निवड करण्यात आली आहे.

संमेलनाच्या नियोजनासाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. बंधुता प्रकाशनाच्या संचालिका मंदाकिनी रोकडे यांची स्वागताध्यक्षपदी, तर विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या सचिव प्रा. सायली गोसावी यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथ्रे यांनी या निवडीची माहिती दिली. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या व्यापक प्रसारासोबतच महिला साहित्यिकांच्या लेखनाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. साहित्य, सामाजिक परिवर्तन आणि संविधानिक मूल्ये यांचा परस्परसंबंध अधोरेखित करण्याच्या दृष्टीने या संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पहिल्यांदाच आयोजित होत असलेल्या या महिला साहित्य संमेलनामुळे पुण्यासह राज्यातील महिला साहित्यिक, लेखिका आणि विचारवंतांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. संमेलनात साहित्यिक आणि सामाजिक विषयांवर विविध उपक्रम, परिसंवाद तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

# संचमान्यतेच्या निकषांवरून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा मोर्चा

## ४ सप्टेंबरला पुण्यात शिक्षण आयुक्त कार्यालयावर धडक; राज्यभरातील सुमारे ३ हजार शिक्षक सहभागी होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संचमान्यतेचे प्रचलित निकष बदलू नयेत, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने पुण्यातील शिक्षण आयुक्त कार्यालयावर शुक्रवारी (दि. ४) मोर्चा काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता शनिवारवाडा येथून मोर्चाला सुरुवात होणार असून, मुंबईपासून गडचिरोलीपर्यंतच्या विविध जिल्ह्यांतील सुमारे तीन हजार शिक्षक सहभागी होणार असल्याची माहिती महासंघाने दिली.

कनिष्ठ महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या संचमान्यतेसाठी शिक्षण विभागाने गेल्या ५० वर्षांपासून प्रचलित असलेल्या निकषांमध्ये बदल केल्याचा आरोप महासंघाने केला आहे. कोणताही स्वतंत्र आदेश न काढता संचमान्यतेची कार्यपद्धती बदलण्यात आल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचा दावा संघटनेने केला आहे.

या बदललेल्या संचमान्यतेमुळे राज्यात सुमारे १० हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची संख्या कमी झाली असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. त्याचा थेट परिणाम तात्पुरत्या सेवेत असलेल्या शिक्षक आणि शिक्षण सेवकांच्या सेवांवर झाला असून, अनेकांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. तसेच काही कायमस्वरूपी शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत.




कोल्हापूर विभागातच सुमारे ४०० शिक्षक अतिरिक्त ठरल्याची यादी जाहीर करण्यात आल्याचे संघटनेने सांगितले. शिक्षकांच्या संख्येत झालेली कपात आणि अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

संचमान्यतेचे निकष अचानक बदलल्यामुळे शिक्षकांचे नुकसान होण्याबरोबरच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. या नुकसानीला जबाबदार कोण?, असा सवाल महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे आणि सरचिटणीस प्रा. लक्ष्मण रोडे यांनी केला. या मोर्चात पुणे जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष प्रा. विक्रम काळे, सरचिटणीस प्रा. हिंमत तोबरे आणि सहसरचिटणीस प्रा. रामानंद वळसे पाटील यांनी केले आहे. मोर्चाच्या माध्यमातून संचमान्यतेचे जुने निकष कायम ठेवण्याची मागणी शिक्षण विभागासमोर जोरदारपणे मांडण्यात येणार असल्याने ४ सप्टेंबरच्या आंदोलनाकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# 'झिरो डासोत्पत्ती'साठी पुणे महापालिकेची व्यापक मोहीम

## डेंग्यू, चिकनगुनिया, झिका प्रतिबंधासाठी विविध विभागांना जबाबदाऱ्या; प्रत्येक विभागात नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पावसाळ्यात डासोत्पत्तीस पोषक वातावरण निर्माण होत असल्याने डेंग्यू, चिकनगुनिया, झिका यांसह किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे महानगरपालिकेने व्यापक उपाययोजना सुरू केल्या आहेत. शहरात 'झिरो डासोत्पत्ती' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महापालिकेच्या विविध विभागांना त्यांच्या अखत्यारीतील परिसरातील पाणीसाठे व डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे तातडीने नष्ट करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त (ज.) पवनीत कौर यांनी दिल्या.

३१ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत महापालिकेच्या विविध विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते. यावेळी मागील तीन वर्षांतील डेंग्यू, चिकनगुनिया आणि मलेरिया रुग्णसंख्येचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला. सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी शहरातील ४१ प्रभागांमधील रुग्णसंख्येचे नकाशानुसार मॅपिंग व सादरीकरण केले.

**आरोग्य विभागाला विशेष जबाबदारी**

डासोत्पत्तीची ठिकाणे शोधून तातडीने नष्ट करणे, रुग्ण आढळलेल्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे, अशा सूचना आरोग्य विभागाला देण्यात आल्या आहेत. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटी मनुष्यबळही तातडीने उपलब्ध करून घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**अतिक्रमण व घनकचरा विभागावरही लक्ष**

अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या साहित्यामध्ये पावसाचे पाणी साचून डासोत्पत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. तसेच रस्ते व फूटपाथवर अनधिकृतपणे टायर-पंक्चर व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन विभागाने सार्वजनिक ठिकाणी पडलेले थर्माकोल, नारळाच्या करवंट्या व इतर निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट लावावी. घंटागाड्यांवर किटकजन्य आजारांपासून बचावासाठी जनजागृतीपर ध्वनिफीत वाजवावी. झोपडपट्टी तसेच सोसायट्यांमध्ये पाणी साचणारे टायर, डबे व अन्य साहित्य हटविण्यासाठी आरोग्य विभागाला सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**उद्यान, पर्यावरण व बांधकाम विभागाची जबाबदारी निश्चित**

महापालिकेच्या उद्यानांतील कारंजे व अन्य पाणीसाठ्यांमध्ये गप्पी माशांचा वापर करण्यासोबतच डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करणारे बॅनर्स लावण्याचे निर्देश देण्यात आले. उद्यानांमध्ये पावसाचे पाणी साचणार नाही, याचीही दक्षता घेण्यास सांगण्यात आले. मुळा-मुठा नदीपात्र, मांजरी, होळकर पूल, म्हाळुंगे-पाषाण तलाव आदी परिसरात जलपर्णी निर्मूलनाची कार्यवाही करण्याचे निर्देश पर्यावरण विभागाला देण्यात आले. शहरातील सर्व निर्माणाधीन बांधकामांची पाहणी करून पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्यास बांधकाम व्यावसायिकांना सूचना द्याव्यात. आवश्यकता भासल्यास दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश बांधकाम विभागाला देण्यात आले.

# कास पठारावर आजपासून फुलोत्सव; रोज 3 हजार पर्यटकांनाच प्रवेश

## शनिवार-रविवारी थेट प्रवेश बंद; पर्यावरण संवर्धनासाठी ऑनलाइन बुकिंग बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

सातारा : प्रतिनिधी

जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या सातारा जिल्ह्यातील जागतिक वारसास्थळ कास पठारावर बहुप्रतीक्षित फुलोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. पावसाळ्यानंतर पठारावर विविधरंगी रानफुलांचा बहर आला असून, हा निसर्गाचा अनोखा आविष्कार पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता आहे.

कास पठारावरील नाजूक जैवविविधता आणि रानफुलांचे संरक्षण करण्यासाठी यंदाही पर्यटकांच्या संख्येवर मर्यादा घालण्यात आली आहे. दररोज जास्तीत जास्त तीन हजार पर्यटकांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. विशेषतः शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी थेट प्रवेश बंद ठेवण्यात आला असून, या दिवशी पर्यटकांना केवळ ऑनलाइन बुकिंगद्वारेच प्रवेश मिळणार आहे.



सध्या कास पठारावर चवर, तेरडा, सीतेचे आसवे, गेंद, नभाळी, आभाळी कंदी आदी विविध प्रकारच्या रानफुलांनी परिसर बहरला आहे. रंगीबेरंगी फुलांचा गालिचा आणि सभोवतालचा निसर्ग पर्यटकांना आकर्षित करत आहे.

कास पठार हे केवळ पर्यटनस्थळ नसून जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील परिसर आहे. त्यामुळे पर्यटकांची वाढती संख्या, पायदळी तुडवली जाणारी फुले आणि वाढता मानवी हस्तक्षेप यामुळे निसर्गसंपदेवर परिणाम होऊ नये, यासाठी प्रवेशसंख्या नियंत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

फुलोत्सवाच्या काळात पर्यटकांनी प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, फुले तोडू नयेत, कचरा करू नये तसेच जैवविविधतेला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यटकांसाठी कास पठाराचा फुलोत्सव आकर्षणाचा विषय असला तरी या निसर्गसंपदेचे संवर्धन ही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे 'निसर्ग पाहा, पण निसर्गाला धक्का लावू नका', या भूमिकेतून पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पहाडदरा येथील पुरातन महादेव मंदिर विकासाच्या प्रतीक्षेत

## रस्ता व वीज सुविधा उपलब्ध झाल्यास धार्मिक पर्यटनाला मिळणार चालना; शासनाने लक्ष देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील पहाडदरा येथील गावच्या पश्चिमेकडील डोंगरावर असलेले पुरातन महादेव मंदिर धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व जपणारे ठिकाण आहे. निसर्गरम्य वातावरण आणि पुरातन मंदिरामुळे या परिसराला धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने मोठी क्षमता असतानाही आवश्यक सोयी-सुविधांच्या अभावामुळे हे ठिकाण अद्याप विकासापासून दूर आहे.

मंदिराकडे जाण्यासाठी पक्का रस्ता आणि नियमित वीज सुविधा उपलब्ध नसल्याने भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः पावसाळ्यात मंदिराकडे जाणारा मार्ग अधिकच अडचणीचा ठरत असल्याने भाविकांची गैरसोय होते. मंदिर परिसरात पक्का रस्ता, वीज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास पहाडदरा येथील महादेव मंदिराचा धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकास होऊ शकतो. निसर्गरम्य डोंगर परिसर आणि पुरातन मंदिर यामुळे भाविकांसह पर्यटकांनाही हे ठिकाण आकर्षित करू शकते.



मंदिर परिसराचा नियोजनबद्ध विकास झाल्यास स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासही मदत होऊ शकते. त्यामुळे शासनाने या मंदिराच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि भाविकांकडून होत आहे.

पहाडदरा येथील पुरातन महादेव मंदिराचे धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व जपत या परिसराला पर्यटनाच्या नकाशावर आणण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष रस्ता, वीज आणि मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यास या दुर्लक्षित धार्मिक स्थळाच्या विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात होईल.

# डेटा सेंटरच्या विस्तारासोबत पर्यावरणीय सुरक्षेलाही प्राधान्य द्या

## पाणी, ऊर्जा आणि पर्यावरणीय परिणामांचा विचार करून शाश्वत धोरण आखण्याची नागरिक सोशल फाउंडेशनची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

पुणे : भारतात डेटा सेंटर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असताना या प्रकल्पांचा पाणी, ऊर्जा, पर्यावरण आणि स्थानिक पायाभूत सुविधांवर होणारा परिणाम गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे. डिजिटल प्रगती आवश्यक असली तरी त्यासाठी नैसर्गिक संसाधनांची किंमत मोजावी लागू नये. त्यामुळे डेटा सेंटरच्या विकासासोबत कठोर पर्यावरणीय निकष आणि शाश्वत धोरण राबवावे, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशनने केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे.

नागरिक सोशल फाउंडेशनच्या वतीने सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी अमेय सप्रे उपस्थित होते. डिजिटल आणि अख क्षेत्रातील भारताची प्रगती आवश्यक आहे; मात्र या विकासासाठी पाणी, पर्यावरण आणि स्थानिक समुदायांच्या हक्कांशी कोणतीही तडजोड होता कामा नये, अशी भूमिका फाउंडेशनने मांडली.

भारतामध्ये जगातील जवळपास १६ टक्के डेटा निर्माण होतो; मात्र जागतिक डेटा सेंटर क्षमतेमध्ये भारताचा वाटा सुमारे १.२ टक्के असल्याचे फाउंडेशनने नमूद केले. त्यामुळे आगामी काळात डेटा सेंटरची संख्या आणि क्षमता मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. या विस्तारामुळे पाणीटंचाई, वाढते तापमान, प्रदूषण, ई-कचरा तसेच स्थानिक पायाभूत सुविधांवरील ताण वाढण्याची शक्यता आहे.

डेटा सेंटरच्या वीज वापरापैकी सरासरी सुमारे १९ टक्के वीज कूलिंगसाठी खर्च होते, तर कमी कार्यक्षम केंद्रांमध्ये हा वाटा ३० टक्क्यांहून अधिक असू शकतो. एका मेगावॅट क्षमतेच्या डेटा सेंटरला दररोज सुमारे ६८,५०० लिटर पाण्याची गरज भासू शकते.

भारतातील डेटा सेंटरचा सध्याचा पाणी वापर अंदाजे १५० अब्ज लिटर प्रतिवर्ष असून, २०३० पर्यंत तो ३५८ अब्ज लिटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता फाउंडेशनने व्यक्त केली आहे.

स ं ग ण क ी य उपकरणांमधून निर्माण होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील उष्णतेमुळे काही भागांमध्ये स्थानिक तापमानवाढीसारखे परिणाम होऊ शकतात. त्यामुळे डेटा सेंटर उभारण्यापूर्वी संबंधित परिसराची वीज, पाणी, पर्यावरण आणि पायाभूत सुविधांची 'कॅरिंग कॅपॅसिटी' तपासणे आवश्यक असल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे.

डिजिटल अर्थव्यवस्थेचा विस्तार करताना पर्यावरणीय किंमत दुर्लक्षित केली तर भविष्यात पाणी, ऊर्जा आणि स्थानिक संसाधनांवर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे 'डेटा सेंटर वाढवा, पण पर्यावरणाच्या किमतीवर नाही', अशी स्पष्ट भूमिका घेत शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारण्याची गरज असल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे

**फाउंडेशनच्या प्रमुख शिफारसी**

* मोठ्या डेटा सेंटर प्रकल्पांसाठी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (एखअ) अनिवार्य करावे. पाणीटंचाई असलेल्या भागांत स्थानिक जलस्रोतांची उपलब्धता तपासल्यानंतरच प्रकल्पांना परवानगी द्यावी.
* डेटा सेंटरसाठी झणए आणि थणए मानके अनिवार्य करावीत. पुनर्वापरित पाण्याचा वापर, पावसाचे पाणी साठवण आणि भूजल पुनर्भरणाची व्यवस्था बंधनकारक करावी.
* मोठ्या डेटा सेंटर परिसरात मियावाकी वने, हरित पट्टे आणि हरित पायाभूत सुविधा विकसित कराव्यात. नवीकरणीय ऊर्जा आणि पाणी-बचत करणाऱ्या कूलिंग तंत्रज्ञानाला प्रोत्साहन द्यावे.
* पाणी, ऊर्जा, उत्सर्जन आणि कचऱ्याचे नियमित पर्यावरणीय निरीक्षण करून त्याची माहिती सार्वजनिक करावी.
* सरकारी प्रोत्साहने पर्यावरणीय अनुपालनाशी जोडावीत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर दंड आणि पर्यावरणीय नुकसानभरपाईची तरतूद करावी.
* डेटा सेंटर क्षेत्राच्या प्रभावी देखरेखीसाठी स्वतंत्र नियामक यंत्रणा आणि शाश्वत डेटा सेंटर धोरण स्थापन करावे.

## सारांश वृत्त

### कालबाह्य अन्नाला नवा जन्म! मुंबईत मुदत व पोषणमूल्यांच्या बनावट लेबलांचा धक्कादायक पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या एका गंभीर प्रकाराचा महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने मुंबईत पर्दाफाश केला आहे. पेपासिको, नेस्ले, कोका-कोला आणि युनिलिव्हर या कंपन्यांच्या मूळ खाद्यपदार्थांवरील मुदत समाप्तीच्या तारखा आणि पोषणमूल्यांची माहिती बदलून ते पदार्थ परदेशात निर्यात करण्याचा कथित गैरप्रकार उघडकीस आला आहे. तुर्भे येथील एका गोदामावर छापा टाकून अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जवळपास ८० हजार डॉलर म्हणजेच सुमारे ६७ लाख रुपयांचा माल जप्त केला आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अन्न अधिकाऱ्यांनी गोदामात सहा दिवस तपास केला. या कारवाईदरम्यान खाद्यपदार्थांवरील उत्पादकांनी छापलेल्या मूळ मुदत समाप्तीच्या तारखा रसायनाच्या साहाय्याने पुसण्यासाठी वापरली जाणारी द्रव्ये, त्यानंतर नव्या तारखा छापण्यासाठीची यंत्रणा आणि बदललेली लेबले मोठ्या प्रमाणात आढळली.

विशेष म्हणजे, केवळ मुदत समाप्तीची तारीखच नव्हे, तर उत्पादनातील घटक आणि पोषणमूल्यांची मूळ माहिती झाकून त्यावर बनावट माहिती असलेली लेबले लावली जात असल्याचे तपासात समोर आले आहे. लेज बटाट्याचे वेफर्स आणि मॅगी नूडल्ससह विविध उत्पादनांच्या लेबलांचे संच गोदामात आढळले.

या प्रकारामुळे अन्नसुरक्षेच्या यंत्रणेसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. एखाद्या खाद्यपदार्थाची मुदत संपल्यानंतर त्यावर नवी तारीख छापून तो पुन्हा विक्रीसाठी किंवा निर्यातीसाठी पाठवला जात असेल, तर ग्राहकांना उत्पादनाची खरी स्थिती समजण्याची कोणतीही संधी राहत नाही. त्याहून गंभीर बाब म्हणजे पोषणमूल्ये आणि घटकांची माहिती बदलल्यास अन्नातील विशिष्ट घटकांपासून सावध राहणाऱ्या ग्राहकांची दिशाभूल होऊ शकते. महाराष्ट्रात सध्या अन्नसुरक्षेबाबत तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली विविध ठिकाणी अचानक तपासण्या सुरू आहेत.

# भारताच्या कारखाना क्षेत्राला मंदीचा धक्का! ऑगस्टमध्ये उत्पादनवाढ पाच वर्षांच्या नीचांकी पातळीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

देशाच्या उत्पादन क्षेत्राच्या वाढीला ऑगस्ट महिन्यात मोठा धक्का बसला आहे. कमकुवत मागणी आणि नव्या आदेशांमधील मंदावलेली वाढ यामुळे भारताच्या कारखाना क्षेत्राची वाढ पाच वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर पोहोचली, अशी माहिती एस अँड पी ग्लोबलने संकलित केलेल्या एचएसबीसी भारत उत्पादन खरेदी व्यवस्थापक निर्देशांकाच्या अहवालातून समोर आली आहे.

ऑगस्टमध्ये उत्पादन खरेदी व्यवस्थापक निर्देशांक ५२.८ अंकांवर घसरला, तर जुलैमध्ये तो ५३.५ अंकांवर होता. प्राथमिक अंदाज ५२.९ अंकांचा होता. या निर्देशांकात ५० पेक्षा जास्त अंक म्हणजे उत्पादन क्षेत्रात वाढ, तर ५० पेक्षा कमी अंक म्हणजे घसरण दर्शवतात. त्यामुळे उत्पादन क्षेत्राची वाढ कायम असली तरी तिचा वेग लक्षणीयरीत्या मंदावल्याचे स्पष्ट होते.



या अहवालातील सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे नव्या आदेशांच्या वाढीचा वेग ऑगस्ट २०२१ नंतरचा सर्वांत कमी राहिला. काही उत्पादनांच्या मागणीत घट आणि बाजारातील आव्हानात्मक परिस्थितीचा परिणाम उद्योगांवर झाल्याचे कंपन्यांनी नमूद केले. परदेशातून मिळणाऱ्या नव्या आदेशांमध्येही वाढ झाली; मात्र आंतरराष्ट्रीय मागणी वाढीचा वेग जुलैच्या तुलनेत कमी झाला.

उत्पादनाचे प्रमाण वाढत राहिले असले तरी त्याची वाढ पाच वर्षांतील सर्वांत मंद होती. याच काळात रोजगाराच्या आघाडीवरही चिंता वाढली आहे. कारखान्यांमधील कर्मचारीसंख्या ३० महिन्यांनंतर प्रथमच घटली. ही घट मर्यादित असली तरी मागणीतील कमकुवतपणामुळे कंपन्या मनुष्यबळाबाबत सावध भूमिका घेत असल्याचे संकेत मिळतात.

दरम्यान, उद्योगांसाठी खर्चाच्या आघाडीवर काहीसा दिलासा मिळाला. उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीतील महागाई सहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आली. त्यामुळे कंपन्यांनी विक्रीच्या किमतीत मोठी वाढ करण्याचे टाळले. परिणामी उत्पादनाच्या विक्री किमतीतील वाढीचा वेग ४५ महिन्यांतील सर्वांत कमी राहिला.

विशेष म्हणजे, उत्पादन क्षेत्रातील वाढ मंदावली असतानाही कंपन्यांचा व्यावसायिक आत्मविश्वास किंचित सुधारला असून तो मे महिन्यानंतरच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचला. मात्र ऐतिहासिक सरासरीच्या तुलनेत हा आत्मविश्वास अजूनही कमी आहे.

भारताची अर्थव्यवस्था एप्रिल-जून तिमाहीत ७.८ टक्क्यांनी वाढली होती. मात्र चालू तिमाहीत वाढीचा वेग ६.६ टक्क्यांपर्यंत मंदावण्याचा अंदाज आहे. त्यामुळे ऑगस्टमधील उत्पादन क्षेत्राची कमजोर कामगिरी ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील मागणीच्या आव्हानांकडे लक्ष वेधणारी ठरली आहे.

## रशियाच्या हल्ल्यात भारतीय नागरिकाचा मृत्यू; युक्रेनमध्ये १२ जणांचा बळी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लंडन : प्रतिनिधी

रशियाने युक्रेनवर केलेल्या ताज्या क्षेपणास्त्र आणि मानवरहित विमानांच्या हल्ल्यांमध्ये एका भारतीय नागरिकासह १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मंगळवारी, १ सप्टेंबर रोजी दिली. या हल्ल्यांमध्ये निवासी इमारती आणि नागरी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले असून अनेक भागांतील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

झेलेन्स्की यांनी सांगितले की, ३१ ऑगस्टच्या संध्याकाळपासून ओडेसा शहर आणि आसपासच्या परिसरात मार्गदर्शित हवाई बॉम्ब आणि मानवरहित विमानांचे हल्ले सुरू आहेत. या हल्ल्यांमुळे हजारो कुटुंबांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. रशियन सैन्याने मानवरहित विमाने आणि क्षेपणास्त्रांचा मारा करत युक्रेनमधील अनेक शहरांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमध्ये झालेल्या जीवितहानीबद्दल झेलेन्स्की यांनी दुःख व्यक्त केले. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, एकूण १२ जणांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये एका भारतीय नागरिकाचाही समावेश आहे. ओडेसासह इतर भागांतील नागरी परिसर आणि पायाभूत सुविधांवर झालेल्या हल्ल्यामुळे युद्धाचा फटका पुन्हा एकदा सामान्य नागरिकांना बसल्याचे स्पष्ट झाले आहे. रशिया-युक्रेन युद्धाला अनेक वर्षे उलटली असली तरी हवाई हल्ल्यांची तीव्रता कायम आहे.

भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याने भारतासाठीही ही घटना गंभीर ठरली आहे. युद्धग्रस्त युक्रेनमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, हल्ल्यांनंतर बाधित भागांत बचावकार्य सुरू असून वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

## बँक कर्मचारी ११ सप्टेंबरला देशव्यापी संपावर; पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी ।

सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचारी संघटनांनी प्रलंबित मागण्यांसाठी देशव्यापी संपाचे हत्यार उपसले आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या नेतृत्वाखाली ११ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करणे, तसेच कामगार संघटनांशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी संघटनांनी केली आहे.

संघटनांनी जाहीर केलेल्या आंदोलनाच्या वेळापत्रकानुसार, ११ सप्टेंबरला एक दिवसाचा संप, त्यानंतर २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांचा संप करण्यात येणार आहे. या कालावधीत मागण्यांवर तोडगा न निघाल्यास २६ ऑक्टोबर २०२६पासून बेमुदत संप सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

बँक कर्मचारी संघटनांची प्रमुख मागणी म्हणजे आठवड्यातील पाच दिवसच बँकांचे कामकाज ठेवणे. सध्या अनेक बँकांमध्ये महिन्याच्या काही शनिवारी कामकाज सुरू असते. त्यामुळे पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याची मागणी दीर्घकाळापासून केली जात आहे.

याशिवाय, सरकारने लागू केलेली कामगिरीशी जोडलेली प्रोत्साहन योजना मागे घ्यावी किंवा तिची अंमलबजावणी तात्पुरती स्थगित करावी, अशी मागणीही संघटनांनी केली आहे. ही योजना एकतर्फी आणि भेदभाव करणारी असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. या योजनेत आवश्यक बदल करण्यासाठी सरकारने बँक कर्मचारी संघटनांशी द्विपक्षीय चर्चा करावी, अशी त्यांची भूमिका आहे.

आता सरकार आणि बँक कर्मचारी संघटनांमध्ये चर्चा होऊन तोडगा निघतो का, याकडे देशभरातील बँक ग्राहकांचे लक्ष लागले आहे. मागण्या मान्य न झाल्यास ऑक्टोबरपासूनचा बेमुदत संप बँकिंग व्यवहारांवर मोठा परिणाम घडवू शकतो.

# सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या पत्रांनंतर राजस्थान उच्च न्यायालयासाठी नव्या मुख्य न्यायाधीशांची शिफारस

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाच्या महाविद्यालयाने छत्तीसगड उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती संजय के. अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील महाविद्यालयाने सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी हा निर्णय घेतला.

या शिफारसीच्या काही दिवस आधी सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी राजस्थान उच्च न्यायालयाचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश एस. पी. शर्मा यांच्या कार्यपद्धतीबाबत पत्रे लिहिल्याची माहिती सार्वजनिक झाली होती. या पत्रांमध्ये न्यायमूर्ती मेहता यांनी काही मुद्द्यांवर आक्षेप नोंदविल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, न्यायमूर्ती संजय के. अग्रवाल यांच्या नियुक्तीची शिफारस ही सर्वोच्च न्यायालयाच्या महाविद्यालयाच्या नियमित घटनात्मक प्रक्रियेचा भाग आहे. महाविद्यालयाच्या शिफारसीनंतर केंद्र सरकारकडून पुढील कार्यवाही केली जाईल. नियुक्तीची अंतिम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिसूचना जारी केली जाईल.

राजस्थान उच्च न्यायालयाच्या सध्याच्या प्रशासकीय व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या महाविद्यालयाने नव्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे.

मात्र, या शिफारसीचा न्यायमूर्ती मेहता यांच्या पत्रांशी थेट संबंध असल्याचे महाविद्यालयाच्या ठरावात नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे दोन्ही घटनांमध्ये कारणसंबंध असल्याचा निष्कर्ष काढण्याऐवजी उपलब्ध अधिकृत माहितीपुरतेच पाहणे महत्त्वाचे आहे.

न्यायमूर्ती संजय के. अग्रवाल यांच्या नियुक्तीनंतर राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदाची जबाबदारी त्यांच्याकडे येणार आहे. पुढील प्रशासकीय आणि न्यायिक कामकाज त्यांच्या नेतृत्वाखाली पार पडेल. या नियुक्तीची औपचारिक प्रक्रिया केंद्र सरकार आणि राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर पूर्ण होईल.

# भारताची बाह्य आर्थिक तूट वाढली; चालू खात्यातील तूट ४.२ अब्ज डॉलरवर, आयात खर्चाचा दबाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : : प्रतिनिधी

भारताच्या बाह्य क्षेत्रासमोरील दबाव किंचित वाढल्याचे चित्र समोर आले आहे. एप्रिल ते जून २०२६ या तिमाहीत भारताची चालू खात्यातील तूट ४.२ अब्ज डॉलरवर पोहोचली, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने मंगळवारी जाहीर केलेल्या आकडेवारीतून समोर आली. ही तूट देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ०.५ टक्के इतकी आहे.

गेल्या वर्षी याच तिमाहीत चालू खात्यातील तूट ३.४ अब्ज डॉलर, म्हणजेच सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ०.४ टक्के होती. त्याच्या तुलनेत यंदा तुटीत ०.८ अब्ज डॉलरची वाढ झाली आहे. वाढत्या वस्तूंच्या किमती आणि देशाची आयात-निर्यात तफावत वाढणे ही या वाढीमागील प्रमुख कारणे असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीतून स्पष्ट होते.

चालू खात्यातील तूट म्हणजे देशातून परदेशात जाणाऱ्या परकीय चलनाचा प्रवाह आणि परदेशातून देशात येणाऱ्या परकीय चलनाच्या प्रवाहातील फरक. सोप्या भाषेत सांगायचे तर, भारताने वस्तू, सेवा आणि इतर परकीय व्यवहारांसाठी परदेशाला जितके परकीय चलन दिले, त्यापेक्षा देशाला कमी परकीय चलन मिळाले तर चालू खात्यात तूट निर्माण होते. मात्र ही तूट थेट आर्थिक संकटाचे लक्षण मानली जात नाही. ती किती आहे आणि तिची भरपाई कोणत्या मार्गाने होते, हे अधिक महत्त्वाचे असते.



यापूर्वीच्या जानेवारी ते मार्च तिमाहीत भारताच्या चालू खात्यात ६.५ अब्ज डॉलरची शिल्लक नोंदवली गेली होती. त्यामुळे एका तिमाहीत शिल्लक स्थितीतून तुटीच्या स्थितीकडे झालेला बदलही लक्षवेधी आहे.

आर्थिक वर्ष २०२६-२७च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीत चालू खात्यातील तूट आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे आयसीआरएच्या मुख्य अर्थतज्ज्ञ अदिती नायर यांनी म्हटले आहे. संपूर्ण आर्थिक वर्षातील तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे ०.९ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

मात्र ही तूट व्यवस्थापित करण्याइतकी परकीय चलनाची उपलब्धता देशाकडे असल्याचे नायर यांनी स्पष्ट केले. विशेषतः परदेशस्थ भारतीयांकडून येणाऱ्या मोठ्या ठेवींच्या प्रवाहामुळे ही तूट सहजपणे भागवली जाऊ शकते. त्यामुळे आर्थिक वर्ष २०२६-२७मध्ये भारताच्या परकीय चलनसाठ्यात वाढ होण्याची शक्यता असून, दोन वर्षांच्या अंतरानंतर साठ्यात पुन्हा भर पडू शकते.

एकूणच, चालू खात्यातील तूट वाढली असली तरी तिचे प्रमाण सध्या मर्यादित आहे. मात्र वस्तूंच्या वाढत्या किमती, आयात-निर्यात तफावत आणि जागतिक बाजारातील बदल यांचा भारताच्या बाह्य क्षेत्रावर पुढील काही तिमाहींमध्ये काय परिणाम होतो, याकडे आर्थिक क्षेत्राचे लक्ष राहणार आहे.

# सीबीआयच्या भ्रष्टाचार प्रकरणांना 'तारीख पे तारीख'! ७,२२९ खटले प्रलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशातील भ्रष्टाचारा विरोधातील कारवाईची गती आणि त्यानंतरची न्यायालयीन प्रक्रिया याबाबत गंभीर चित्र समोर आले आहे. केंद्रीय दक्षता आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, केंद्रीय अन्वेषण विभागाने तपास केलेली तब्बल ७,२२९ भ्रष्टाचाराची प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये खटल्याच्या प्रतीक्षेत आहेत. यातील ४०९ प्रकरणे वीस वर्षांहून अधिक काळ न्यायालयात प्रलंबित आहेत. भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाईचे दावे सातत्याने केले जात असताना, न्यायालयीन पातळीवर प्रकरणे वर्षानुवर्षे रखडत असतील तर तपास यंत्रणा, सरकारी अभियोक्ते आणि न्यायप्रक्रियेच्या कार्यक्षमतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालात ३१ डिसेंबर २०२५ रोजीची स्थिती मांडण्यात आली आहे. एकूण ७,२२९ प्रलंबित खटल्यांपैकी १,६१२ प्रकरणे तीन वर्षांपेक्षा कमी काळापासून, ८६० प्रकरणे तीन ते पाच वर्षांपासून, तर तब्बल १,९०१ प्रकरणे पाच ते दहा वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित आहेत. म्हणजे भ्रष्टाचाराच्या प्रकरणांना न्यायालयीन निकालापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागत असल्याचे स्पष्ट होते.

सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे दहा ते वीस वर्षे आणि त्याहून अधिक काळ प्रलंबित असलेली प्रकरणे. ४०९ खटले वीस वर्षांपेक्षा जास्त काळ न्यायालयात रखडले आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आरोपी आणि सरकारी यंत्रणा दोघांनाही प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागते. मात्र वर्षानुवर्षे निकाल न लागल्यामुळे भ्रष्टाचाराविरोधातील कारवाईचा प्रतिबंधात्मक परिणाम कितपत प्रभावी राहतो, हा मूलभूत प्रश्न या अहवालामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

केवळ न्यायालयातील प्रलंबित खटलेच नव्हे, तर केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपासाच्या टप्प्यावरही ४७३ भ्रष्टाचाराची प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी ३९ प्रकरणांचा तपास पाच वर्षांपेक्षा अधिक काळ सुरू असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. म्हणजे भ्रष्टाचाराविरोधातील प्रक्रिया तक्रार, तपास, आरोपपत्र आणि त्यानंतरची न्यायालयीन सुनावणी अशा प्रत्येक टप्प्यावर वेळखाऊ ठरत असल्याचे दिसते.

भ्रष्टाचाराशी संबंधित अपील आणि फेरविचार अर्जांचाही मोठा अनुशेष आहे. अहवालानुसार, ३,८५४ अपील किंवा फेरविचार अर्ज पाच वर्षांपेक्षा अधिक, पण दहा वर्षांपेक्षा कमी काळापासून प्रलंबित आहेत. १,९८७ प्रकरणे दोन ते पाच वर्षांपासून, तर २,९९५ प्रकरणे दोन वर्षांपेक्षा कमी काळापासून प्रलंबित आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा प्रश्न केवळ तपास पूर्ण करण्यापुरता मर्यादित नसून, त्यानंतरच्या कायदेशीर प्रक्रियेतही मोठा विलंब होत असल्याचे स्पष्ट होते.

या परिस्थितीत सरकारने भ्रष्टाचाराविरोधात कठोर कायदे आणि तपास यंत्रणांच्या कारवाईचे कितीही दावे केले, तरी वेळेत दोषींना शिक्षा झाली नाही तर त्या कारवाईचा प्रत्यक्ष परिणाम काय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये दीर्घ विलंबामुळे साक्षीदार उपलब्ध न राहणे, पुरावे कमकुवत होणे, कागदपत्रांची विश्वासार्हता प्रभावित होणे आणि प्रकरणाविषयी सार्वजनिक लक्ष कमी होणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

७,२२९ भ्रष्टाचाराचे खटले न्यायालयात प्रलंबित आणि त्यापैकी ४०९ प्रकरणे दोन दशकांहून अधिक काळ रखडलेली असणे ही केवळ आकडेवारी नाही; हे भ्रष्टाचारविरोधी व्यवस्थेच्या गतीवरचे गंभीर प्रश्नचिन्ह आहे. भ्रष्टाचाराला आळा घालायचा असेल तर केवळ तपास सुरू करणे पुरेसे नाही. तपासाला वेग, सक्षम सरकारी बाजू आणि वेळेत न्यायालयीन निकाल मिळणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा भ्रष्टाचाराविरोधातील 'कठोर कारवाई' कागदोपत्रीच राहून, न्याय मात्र वर्षानुवर्षे फाईलमध्येच अडकून राहण्याचा धोका आहे.